# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com website – www.jdteromumbai.com

परिपत्रक

क्र. २/विकामुं/तंशि/इबीसी/२०१८/698

दिनांक : 28 FEB 2018

प्रति,
सर्व शासकीय, अशासकीय विनाअनुदानीत,
खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित
एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका,
औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालये.

विषय : ईबीसी २०१७-१८ करिता मार्गदर्शक सूचना
खाजगी विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षण संस्थेमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती तसेच वसतीगृह निर्वाहभत्ता योजनेबाबत

१. **"राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना"**
२. **"डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना"**

(संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज भरुन घेणे)

संदर्भ : १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/डीबीटी-ईबीसी/२०१८/५८, दि. १४/०२/२०१८
२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४, दि.१४-०२-२०१८
३. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, परिपत्रक क्र. ईबीसी-२०१८/प्र.क्र.३८/तांशि-४, दि.१४-०२-२०१८
४. तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांची दि. १६/०२/२०१८ रोजीची जाहिरात

संदर्भीय पत्रान्वये सर्व शासकीय (शासकीय अभिमत विद्यापीठांसह), अशासकीय अनुदानीत व खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित (खाजगी अभिमत/स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) एमबीए, एमसीए, वास्तुशास्त्र, अभियांत्रिकी पदवी/पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी/पदविका महाविद्यालयांना कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये प्रवेशित आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या ५० टक्के प्रतिपूर्तीबाबतचे ऑनलाईन अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावरील http://www.dtemaharashtra.gov.in या लिंकवर भरुन घेण्याकरिताची तरतूद उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. सदर अर्ज भरुन घेण्याचा कालावधी दि. ०३/०३/२०१७ पर्यंतच ठेवण्यांत आला आहे. दि. २०/०२/२०१८ ते १२/०३/२०१८ पर्यंत संस्थांनी प्राप्त झालेल्या ऑनलाईन फॉर्म्सची छाननी करुन सदर अर्ज ऑनलाईन फॉरवर्ड करण्याची कार्यवाही पूर्ण करायची आहे.

जरी संस्थांना दि. १२/०३/२०१८ पर्यंत छाननीची मुदत दिलेली असली तरी संस्थांनी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज विद्यार्थ्यांकडून जस जसे प्राप्त होतील तस तशी मंजूरीची कार्यवाही पूर्ण करायची आहे. व संस्थांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेले अर्ज दि. ०५/०३/२०१८ पर्यंत मंजूरीची कार्यवाही पूर्ण करावयाची आहे. ज्या संस्थेमधील सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज जमा झाले असतील व संस्थांनी सर्व अर्ज मंजूर केले असतील अशा संस्थांनी त्यांच्या संबंधीत खालील छाननी केंद्रांमध्ये दि. ०५/०३/२०१८ ते १२/०३/२०१८ या कालावधीत तात्काळ छाननीसाठी अर्ज सादर करावेत. तसेच संस्थांना सूचित करण्यांत येते की, संस्थांनी त्यांच्या अर्जामध्ये कोणतीही त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यायची आहे. जेणेकरुन छाननी केंद्रांमध्ये त्वरेने अर्ज मंजूर होणे सोयीचे होईल.

टीप : संस्थेने ह्या कामाकरिता जादा मनुष्यबळ नियुक्त करुन सदरचे काम युध्दपातळीवर पूर्ण करायचे आहे. ज्या संस्था त्वरेने छाननी करुन दि. १२/०३/२०१८ पर्यंत छाननीचे काम पूर्ण करुन घेणार नाहीत. अशा संस्थांच्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत संस्थांची राहील.

...२.

Scanned by CamScanner

सर्व संस्थांतील ईबीसी पात्र विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर जरी या आधी अर्ज केलेले असले किंवा तांत्रिक कारणांमुळे काही विद्यार्थ्यांना अर्ज करता आले नसले तरी अशा सर्व विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज व आवश्यक ती शैक्षणिक कागदपत्रे विद्यापीठ/महाविद्यालये/तंत्रनिकेतनांनी द्वीप्रतीत उपलब्ध करुन घ्यावयाची आहेत. त्यासाठी सर्व सूचना/परिपत्रक संबंधीत संस्थांनी/विद्यापीठांनी सूचना फलकावर दर्शनी भागात ठळक व व्यापक स्वरुपात प्रसिध्द करावेत. तसेच सदरहू सूचना विद्यार्थ्यांना वर्गामध्ये शिक्षकांमार्फत द्यावी. संबंधीत विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थांमधील कोणताही विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहणार नाही. याची दक्षता संस्थांच्या प्रमुखांनी घ्यावी. विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थांच्या प्रमुखांची राहील. संगणक प्रणालीवर संदर्भीय विषयांकीत विद्यापीठ, महाविद्यालय, संस्थांमधील विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीमध्ये ऑनलाईन अर्जांची माहिती संगणक प्रणालीवर नमूद केलेल्या अनुसूचीनुसार भरण्यांत यावी.

**छाननी केंद्रांचा तक्ता**

| अ.क्र. | विभाग | छाननी केंद्र |
|---|---|---|
| १ | मुंबई | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई<br>४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ |
| २ | ठाणे | शासकीय तंत्रनिकेतन, ठाणे<br>फडकेपाडा, दिवा-शिळ रोड, भारत गियर्स कंपनी समोर, कौसा-मुंब्रा |
| ३ | नवी मुंबई | तेरणा इंजिनियरिंग कॉलेज, नेरुळ,<br>नवी मुंबई |
| ४ | कोकण | शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी |

**शासनाने शै.व. २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये आतापर्यंत जे जे शासन निर्णय निर्गमित केलेले आहेत. ते सर्व शासन निर्णय या कार्यालयाच्या संकेत स्थळावर परिपत्रकाद्वारे वेळोवेळी संस्थांना कळविण्यांत आले आहेत व प्रत्येक शासन निर्णयात कोणता बदल करण्यांत आला आहे याबाबतही संस्थांना वेळोवेळी अवगत करण्यांत आले आहे. सर्व संस्थांनी त्यांनुसार कार्यवाही करणे अपेक्षित आहे.**

<u>ऑनलाईन अर्जासोबत खालील कागदपत्रे असणे अनिवार्य आहे.</u>

१. ऑनलाईन अर्ज
   **(अर्जाच्या शेवटी विद्यार्थी व विद्यार्थ्याच्या पालकाची स्वाक्षरी व त्याखाली प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी अनिवार्य आहे.)**
२. ऑनलाईन अर्जाची रिसिट कम अॅकनॉलेजमेंट
   **(अर्जाच्या शेवटी केवळ प्राचार्य/संचालकांची स्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.)**
३. मूळ उत्पन्नाचा दाखला
४. डोमिसाईल सर्टिफिकेट
५. मागिल वर्षाच्या गुणपत्रिका (विद्यार्थ्याच्या गुणपत्रिकेवर FAIL असे नमूद केलेले असल्यास पुढील वर्षात प्रवेशासाठी पात्र असल्याबाबतचे प्राचार्यांचे साक्षांकन [Attestation] असणे अनिवार्य आहे.)
६. रेशनकार्डची छायांकीत प्रत
७. गॅप असल्यास मूळ प्रतिज्ञापत्राची नोटरी असलेली प्रत (Original affidavit should be submit)
८. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ची शुल्क जमा पावती
९. वडील हयात नसल्यास मृत्यू दाखला (आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला असल्यास)
१०. आधार कार्डाची छायांकीत प्रत
११. पासबुकची छायांकीत प्रत (पासबुक केवळ विद्यार्थ्यांच्या नावे असावे. संयुक्त खाते असल्यास प्रथम विद्यार्थ्यांचे नाव असलेल्या पासबुकची प्रत असावी.)
१२. स्वयं सांक्षाकन घोषणापत्र (विद्यार्थ्याने स्वयं सांक्षांकन केले असल्यास)
१३. केंद्रिभूत प्रवेश घेतलेल्या अलॉटमेंट लेटरची प्रत
१४. साध्या पेपरवर विद्यार्थी वडील/आई/पालकांच्या सहमतीने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र
   (दोन्ही योजनांकरिता आवश्यक असलेले प्रतिज्ञापत्र या परिपत्रकासोबत जोडलेले आहे.)

**सर्व संस्थांना सूचित करण्यांत येते की, त्यांनी वरील कागदपत्रे संस्था स्तरावर समिती गठीत करुन सुव्यवस्थितपणे त्याची छाननी करावी. जेणेकरुन एकही विद्यार्थी ईबीसी सवलतीपासून वंचित होणार नाही.**

...३.

Scanned by CamScanner

तसेच संस्थांनी ईबीसीचे प्रस्ताव सादर करतांना खालील प्रमाणपत्रे व कागदपत्रे जोडणे अनिवार्य आहे.

१. विहीत केलेले हमीपत्र व प्रमाणपत्र [या परिपत्रकासोबत जोडलेले आहे.]
(संस्था स्तरावरील समितीने छाननी केलेल्या समितीद्वारे छाननी केलेल्या एकूण अर्जांबाबतचे)

२. शिक्षण शुल्क तक्ता [या परिपत्रकासोबत जोडलेला आहे.]

महत्त्वाची टिप्पणी :

१. ईबीसी २०१७-१८ च्या संगणक प्रणालीवर इन्स्टिट्यूट लॉगिन मध्ये विद्यार्थ्यांचे पासवर्ड रिसेट करुन देण्याची सोय उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. तरी सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, जे विद्यार्थी पासवर्ड विसरलेले असतील किंवा त्यांच्या पासवर्डने त्यांना लॉगिन होता येत नसेल अशा विद्यार्थ्यांचे पासवर्ड संस्था स्तरावर रिसेट करुन द्यावेत.

२. सर्व संस्थांना कळविण्यांत येते की, जे विद्यार्थी इतर संस्थांमधून होऊन आपल्या संस्थेत आलेले आहेत. अशा विद्यार्थ्याचा तपशिल ईबीसी संकेतस्थळाच्या मेसेज बॉक्सद्वारे कळवायचा आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांचा ॲप्लिकेशन आयडी, विद्यार्थ्याचे नाव, ज्या संस्थेतून विद्यार्थी स्थलांतरीत होऊन आला असेल त्या संस्थेचे नाव, अभ्यासक्रमाचे नाव व त्याचे प्रथम प्रवेशित वर्ष इ. आवश्यक आहे.

३. अर्जासोबत जोडावयाच्या सर्व छायांकीत प्रती साक्षांकीत केलेल्या असाव्यात. विद्यार्थ्याने स्वयं सांक्षाकन केलेले असल्यास प्रचलित नियमानुसार विद्यार्थ्याने विहीत प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
(साक्षांकीत प्रती नसलेले व वरीलप्रमाणे विहीत कागदपत्र न जोडलेले अर्ज कोणतीही पूर्वसूचना न देता रिजेक्ट केले जातील.)

Important Note :

All Xerox copies with EBC form should be attested. If student submit the self attested documents then valid certificate should be submitted by student. (Without attested copies & without valid document forms will be reject any prior intimation.)

सहपत्रे : वरीलप्रमाणे

सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई
यांचेकरिता

Scanned by CamScanner

ईबीसी पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्जांचे प्रस्ताव सादर करताना
संस्थेने लेटरहेडवर सादर करावयाचे प्रमाणपत्र व हमीपत्र

**(प्रमाणपत्र व हमीपत्र एकाच लेटरहेडवर सादर करावे.)**

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता या संस्थेतील एकूण ....... विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरलेले आहेत. त्यापैकी संस्थास्तरावर एकूण ....... अर्जांची छाननी, संस्थांतर्गत छाननी समितीमार्फत करण्यांत आली असून ....... एवढ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यांत आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| अर्ज प्रत्यक्ष<br>स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी | तपासणी<br>अधिकाऱ्याची स्वाक्षरी | अर्ज प्रमाणित<br>अधिकाऱ्याची स्वाक्षरी |

## हमीपत्र

या संस्थेमार्फत शैक्षणिक वर्ष २०....-.... करिता एकूण ....... अर्ज सादर करण्यांत येत असून सर्व अर्जांची छाननी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार संस्थेमध्ये ईबीसी अर्ज छाननीकरिता गठीत केलेल्या समितीमार्फत करण्यांत आली असून प्रत्येक अर्जासोबत आवश्यक असलेली कागदपत्रे अचूक व योग्य जोडलेली आहेत. सोबतच्या अर्जांमध्ये त्रुटी आढळल्यास व अर्ज नामंजूर झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील.

संस्थाप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का

Scanned by CamScanner

# शिक्षण शुल्क तक्ता

| शैक्षणिक वर्ष | शिक्षण शुल्क समितीकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क | वर्षनिहाय वाढीव शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २०११-१२ | | कॉलम २च्या ७ % | कॉलम २ + ३ |
| २०१२-१३ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१३-१४ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१४-१५ | | कॉलम २च्या ८ % | कॉलम २ + ३ |
| २०१५-१६ | | ---- | कॉलम २ प्रमाणे |
| २०१६-१७ | | ---- | कॉलम २ प्रमाणे |
| २०१७-१८ | | ---- | कॉलम २ प्रमाणे |

## उदाहरणार्थ

| शैक्षणिक वर्ष | शिक्षण शुल्क समितीकडून मंजूर झालेले शिक्षण शुल्क | वर्षनिहाय वाढीव शुल्क | एकूण शुल्क |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| २०११-१२ | ६५००० | ४५५० | ६९५५० |
| २०१२-१३ | ७०००० | ५६०० | ७५६०० |
| २०१३-१४ | ७५००० | ६००० | ८१००० |
| २०१४-१५ | ८०००० | ६४०० | ८६४०० |
| २०१५-१६ | ९०००० | ---- | ९०००० |
| २०१६-१७ | १००००० | ---- | १००००० |
| २०१७-१८ | १२०००० | ---- | १२०००० |

शै.वर्ष २०१५-१६ पासून शिक्षण शुल्क ८% ने वाढविण्याचा नियम रद्द करण्यांत आल्याने प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क त्या त्या शैक्षणिक वर्षात मंजूर केल्यानुसारच राहणार आहे.

Scanned by CamScanner

"राजषी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क प्रतिपूर्तीयोजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८"

## विदयार्थी वडीलपालकांच्या सहमतीने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र/आई/

१. मी आम्ही /खाली सही करणार असे प्रमाणित करतो .मी आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील आहे ,करते की / करते तसेच मी आम्ही उच्च व तंत्र शिक्षण /कुटुंबातील दोन्ही पालकांचे वार्षिक उत्पन्नाचे निकष पूर्ण करतो ०७ -दिनांक ,४-तांशि/३३२..क्र.प्र/२०१७-संकीर्ण -शासन निर्णय क्रमांक ,विभागऑक्टोबर २०१७ रोजीचा शुल्क प्रतिपूर्तीबाबतचा शासननिर्णय वाचला असून त्यातील सर्व अटी मान्य आहेत .

२. मीवादग्रस्त महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती क्षेत्रातील /आम्ही महाराष्ट्र राज्याचा अधिवासधारक आहे/ .अधिवासधारक आहे

३. माझा प्रवेश हा शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे )CAP.झालेला आहे (

४. मीअन्य /आम्ही फक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मिळणाऱ्या योजनेच्या सवलतीचा लाभ घेतलेला आहे/ .अशी हमी देत आहे ,कोणत्याही योजनेसाठी अर्ज केलेला नाही व करणार नाही

५. मी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या संस्थेत शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे व प्रत्येक सत्राची परीक्षा देणे मला बंधनकारक आहेपरीक्षा दिलेली नसल्यास (सेमिस्टरची) मी एखाद्यासत्राची .याची मला जाणिव आहे . .अथवा एखाद्या वर्षात अनुतीर्ण झाल्याने पुढील वर्षी प्रवेश न मिळाल्याने सदर योजना लागू राहणार नाही मी अभ्यासक्रम पूर्ण करत ाना एकूण कालवधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णतअनुतीर्ण झाल्याने : त्या अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी मला प्रवेश मिळाला नसेल तर उर्वरित अभ्यासक्रमाच्या .याची मला जाणिव आहे .कालावधीसाठी मला लाभ मिळण्यास मी अपात्र राहीन

६. मीआम्ही संस्थेला दि/लेली अर्जात नमुद केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी नाहीसंस्थेला . सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभूल करणारी आहे असे निदर्शनास आल्यास उर्वरित तसेच मला मिळालेली प्रतिपूर्ती शुल्काची रक्कम व्याजासह .कालावधीसाठी मला लाभ मिळणार नाही माझ्याकडून वसूल करण्यात येईलशुल्क प्रतिपूर्ती मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल /त्यापुढे मला शिष्यवृत्ती . .जबाबदार राहील :आम्ही स्वत /या परिणामास किंवा शिक्षेस सर्वस्वी मी-याची मला जाणिव आहे व होणा

७. माझ्या स्वतःच्या चुकीने पूर्व परवानगी ,वर्तनामुळे शैक्षणिक प्रगती करीत नसेल /शिवाय मी अनियमित गैरहजर राहत असेल असे संस्थाप्रमुखांच्या निदर्शनास आलेतर माझी शुल्क प्रतीपुर्तीची रक्कम त्वरीत . .याची मला जाणिव आहे .थांबविण्यात येईल किंवा समाधान न झाल्यास रद्द करण्यात येईल

८. मी मध्येच अभ्यासक्रम सोडून गेलो तर मला प्रदान केलेल्या प्रतिपूर्तीची रक्कम शासनास योग्य वाटल्यास माझ्याकडून वसूल करू शकेल याची मला कल्पना आहे.

९. प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पुर्वसुचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व बदल केल्यामुळे आमचे नुकसान झाल्यास मीआम्ही किंवा संस्था / शासनाविरुध्द दावा.तक्रार करणार नाही /

विद्यार्थ्याची सही

( -नांव)

पालकांची सही

( -नांव)

संस्था प्रमुखांची सही व शिक्का

Scanned by CamScanner

“ डॉ. पंजाबराव देशमुखवसतीगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८”

## विदयार्थी वडीलपालकांच्या सहमतीने सादर करावयाचे प्रतिज्ञापत्र/आई/

१०. मीपंजाबराव देश .आम्ही डॉ /मुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी पात्र असुन विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी आहेत किंवा नोंदणीकृत मजूर आहेततसेच .तसेच वसतीगृहात प्रवेश घेतलेला आहे . .किंवा स्त्रोत नाही (नोकरी इत्यादी/व्यापार /व्यवसाय .उदा) याव्यतिरिक्त इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन

११. मी.वादग्रस्त महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती क्षेत्रातील अधिवासधारक आहे /आम्ही महाराष्ट्र राज्याचा/

१२. माझा प्रवेश हा शासनाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे )CAP.झालेला आहे (

१३. मी आम्ही फक्त/डॉपंजाबराव देश .मुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेसाठी सवलतीचा लाभ मंजुरीस्तव अर्ज करीत आहेअशी ,वसतिगृह निर्वाह भत्याच्या अन्य कोणत्याही योजनेसाठी अर्ज केलेला नाही व करणार नाही . हमी देत आहे.

१४. मी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या संस्थेत शिक्षणासाठी वर्गात उपस्थित राहणे व प्रत्येक सत्राची परीक्षा देणे मला बंधनकारक आहेपरीक्षा दिलेली नसल्यास (सेमिस्टरची) मी एखाद्यासत्राची .याची मला जाणिव आहे . अथवा एखाद्या वर्षात अनुतीर्ण झाल्याने पुढीलवर्षी प्रवेश न मिळाल्याने सदर योजना लागू राहणार नाही . अनुतीर्ण झाल्याने त्या :मी अभ्यासक्रम पूर्ण करताना एकूण कालवधीत दोन किंवा त्यापेक्षा अधिक वेळी पूर्णत अभ्यासक्रमाच्या पुढील शैक्षणिक वर्षासाठी मला प्रवेश मिळाला नसेल तर उर्वरित अभ्यासक्रमाच्या कालावधीसाठी मला लाभ मिळण्यास मी अपात्र राहीन.याची मला जाणिव आहे .

१५. मीसंस्थेला .आम्ही संस्थेला दिलेली अर्जात नमुद केलेली माहिति चुकीची अथवा दिशाभूल करणारी नाही/ सादर केलेली माहिति चुकीची अथवा दिशाभूल करणारी आहे असे निदर्शनास आल्यास उर्वरित कालावधीसाठी मला लाभ मिळणारनाहीतसेच मला मिळालेली लाभाची रक्कम व्याजासह माझ्याकडून . त्यापुढे मला निर्वाह भत्ता मिळण्यास प्रतिबंधित केले जाईल याची मला जाणिव आहे व .वसूल करण्यात येईल .जबाबदार राहील :आम्ही स्वत /या परिणामास किंवा शिक्षेस सर्वस्वी मी-होणा

१६. माझ्या स्वतःच्या चुकीनेवर्तना /मुळे शैक्षणिक प्रगती करीत नसेलपूर्व परवानगी शिवाय मी अनियमित , तर माझा निर्वाह भत्ता रक्कम त्वरीत थांबविण्यात .गैरहजर राहत असेल असे संस्थाप्रमुखांच्या निदर्शनास आले .याची मला जाणिव आहे .येईल किंवा समाधान न झाल्यास रद्द करण्यात येईल

१७. मी मध्येच अभ्यासक्रम सोडून गेलो तर मला प्रदान केलेल्या लाभाची रक्कम शासनास योग्य वाटल्यास माझ्याकडून वसूल करू शकेल याची मला कल्पना आहे.

१८. प्रस्तुत योजनेच्या अंमलबजावणीबाबतच्या कोणत्याही पुर्वसुचना न देता बदल अथवा सुधारणा करण्याचे अधिकार शासनास राहतील व बदल केल्यामुळे आमचे नुकसान झाल्यास मीआम्ही किंवा संस्था / .तक्रार करणार नाही /शासनाविरुध्द दावा

| | |
|---|---|
| विद्यार्थ्याची सही | पालकांची सही |
| ( -नांव) | ( -नांव) |

संस्था प्रमुखांची सही व शिक्का

Scanned by CamScanner

## स्वयं घोषणापत्र

मी, कु. ______________________ श्री. ______________________ यांचा मुलगा/ मुलगी/ पाल्य, वय ____ वर्षे, राहणार ______________________

______________________ असे घोषित करतो की, शैक्षणिक वर्ष २०१ - २०१ मध्ये ---------------- ------------------------------------------------ ह्या महाविद्यालयात केंद्रिभूत प्रवेश प्रक्रिये मार्फत -------------- -------------- ह्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतला असून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये मी शासनाच्या कोणत्याही योजनेतून शैक्षणिक शुल्काचा लाभ घेतलेला नाही. मला इतर योजनेतून लाभ मंजूर झाल्यास या योजनेद्वारे प्राप्त झालेली रक्कम शासनाकडे जमा करीन.

स्वाक्षरी :

विद्यार्थ्यांचे नाव : ______________________

______________________

Scanned by CamScanner